# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

## दिनांकः02.09.2026 वारःबुधवार

---

**ठळक बातम्या**

1. दहशतवादाबाबत दुटप्पी धोरणाला स्थान नसल्याचं पंतप्रधानांचं शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत ठाम प्रतिपादन.
2. जलशक्ती मंत्रालयाच्या परिषदेच्या समारोप सत्राला आज पंतप्रधान संबोधित करणार.
3. साखर आणि कांद्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यासाठी सरकारचे प्रयत्न.
4. बेल्जियमचे पंतप्रधान आजपासून भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर.
5. अफगाणिस्तानबरोबरच्या टी-20 सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघ घोषित.

**पंतप्रधान मोदी**

दहशतवादाबाबत दुटप्पी धोरणाला कोणतंही स्थान असू शकत नाही, त्यामुळं दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा, कट्टरतावाद आणि दहशतवाद्यांची आश्रयस्थानं मोडीत काढण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल बिश्केक इथं 26 व्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी जगाच्या विविध भागांत सुरू असलेल्या संघर्षांबाबतही चिंता व्यक्त केली. शांघाय सहकार्य संघटना सभ्यता संवाद मंचाचं पहिलं सत्र या वर्षी भारतात होणार असल्याबद्दलही मोदी यांनी आनंद व्यक्त केला. आगामी 25 वर्षांसाठी एक कृती आराखडा तयार करण्याचं आवाहन करत सुरक्षा, संपर्क आणि संधी या क्षेत्रांमध्ये ठोस परिणाम साध्य करण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला. या शिखर परिषदेनंतर, सदस्य देशांच्या नेत्यांनी 'बिश्केक जाहीरनाम्यावर' स्वाक्षरी केली.

दरम्यान, या परिषदेत दहशतवाद विरोधी उपाययोजना, हवामान कृती कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन, ऊर्जा आणि डिजीटल सहकार्य या क्षेत्रातील विविध 13 प्रमुख ठराव आणि चार सामंजस्य करार करण्यात आले. त्याशिवाय परिषदेची अधिकृत भाषा म्हणून इंग्रजीचा समावेश करण्यासह 20 हून अधिक निर्णयांना मंजुरी देण्यात आली.

**पीएम जलशक्ती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जलशक्ती मंत्रालयाच्या दोन दिवसीय विभागीय परिषदेच्या समारोप सत्राला संबोधित करणार आहेत. टीम इंडिया ही भावना बळकट करण्यासाठी आणि सहकारी संघराज्यवादाच्या दृढीकरणासाठी विभागीय परिषदेच्या मालिकांची संकल्पना पंतप्रधानांनी मांडली होती. त्या अनुषंगाने ही पहिलीच विभागीय परिषद आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांना एकाच व्यासपीठावर आणून या क्षेत्रातील महत्त्वाच्या प्राधान्यक्रमावर चर्चा करण्यासाठी आणि कालमर्यादित कृती आराखडे तयार करण्यास या परिषदांची मदत होणार आहे. जल पायाभूत सुविधा प्रकल्पांची वेळेवर अंमलबजावणी, जल संचय जन भागीदारी, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची शाश्वतता आणि जल जीवन मिशन ची दुसरी आवृत्ती या चार प्रमुख क्षेत्रांवर या परिषदेत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आली होती.

**स्वदेश आवाहन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकवार नागरिकांना अनावश्यक सोने खरेदी, परदेशातले विवाह सोहळे यांच्यावरील खर्च टाळून स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांनी एक ध्वनिचित्रफीत जारी करत हे आवाहन केले आहे. देशाने 7 पूर्णांक 8 दशांश टक्के जीडीपी विकास दर नोंदवल्याबद्दल नागरिकांचे अभिनंदन केले आहे. जागतिक अस्थिरतेचे वातावरण, युद्धजन्य परिस्थिती, पुरवठा साखळीतील अडथळे यावर मात करत देश प्रगती करत असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केलं आहे.

**कृषी योजना**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'च्या प्रगतीचा आढावा घेतला. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या 100 जिल्ह्यांमध्ये, योजनेची अंमलबजावणी जलद करणे, विविध

योजनांमधील परस्पर समन्वय अधिक दृढ करणे आणि शेतकऱ्यांसाठी जिल्हास्तरावरील कामगिरी सुधारणे या मुद्द्यांवर प्रामुख्यानं भर देण्यात आला.

**राहुल गांधी-भेट**

काँग्रेस नेते आणि लोकसभेचे खासदार राहुल गांधी आज नाशिकला भेट देणार आहेत. पक्षाच्या 'सृजन संघटन अभियाना' अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या 72 जिल्हाध्यक्षांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिराच्या समारोप सत्राला ते उपस्थित राहणार आहेत. यावेळी ते 'जागतिक राजकारण आणि भारत' या विषयावर उपस्थितांना संबोधित करतील.

**जंतर-मंतर गुन्हे**

सर्वोच्च न्यायालयानं काल जुलै महिन्यात नीट पेपरफुटीवरून झालेल्या विद्यार्थी निदर्शनांबाबत देशभरात दाखल केलेले प्राथमिक चौकशी अहवाल बंद करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणांचा पाठपुरावा केला जाऊ नये आणि ते सर्वार्थाने बंद करावेत असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. केंद्र सरकार, दिल्ली पोलीस तसंच बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि आसाम या राज्यांनी दाखल केलेल्या अर्जांमध्ये नमूद केलेल्या विद्यार्थी निदर्शनांशी संबंधित तक्रारी देखील सर्वोच्च न्यायालयानं रद्द केल्या आहेत. मात्र, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींविरुद्ध चौकशी सुरू ठेवण्याची परवानगी न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिली आहे.

दरम्यान, सरकारच्या गुन्हे मागे घेण्याच्या आश्वासनानंतर सीजेपीने पाच सप्टेंबरचं आंदोलन रद्द केले आहे. या निर्णयाचं सरकारनं स्वागत केलं असून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणतीही कारवाई होणार नसल्याचं केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी स्पष्ट केलं.

**साखर पुरवठा**

सरकारनं घाऊक साखर व्यापाऱ्यांसाठी साठा ठेवण्याची मर्यादा 4 हजार क्विंटलवरून कमी करून 2 हजार क्विंटल केली आहे. ही नवीन मर्यादा 15 सप्टेंबरपासून ते 30 नोव्हेंबरपर्यंत लागू असेल. साठेबाजीला आळा घालणं, तसंच साखरेची पुरेशी उपलब्धता आणि किमतीतील स्थिरता सुनिश्चित करून ग्राहकांचं हित जपणं या उद्देशानं हा निर्णय घेण्यात आला आहे. सुधारित तरतुदींनुसार, साखर व्यापाऱ्यांना साठा मिळाल्याच्या तारखेपासून 30 दिवसांपेक्षा जास्त काळ साखरेचा साठा करता येणार नाही.

**कांदा**

देशात कांद्याचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. तसंच हंगामी भाववाढीला नियंत्रित करण्यासाठी 'कांदा एक्सप्रेस' आणि रस्ते वाहतुकीद्वारे राखीव साठ्यातील कांदा टप्प्याटप्प्यानं आणि नियोजित पद्धतीनं बाजारात आणण्यास सुरुवात केल्याचं सरकारनं म्हटलं आहे. कांद्याची सर्वत्र उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी 30 हून अधिक ट्रक रवाना करून 19 शहरांमध्ये किरकोळ बाजारात कांदा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न वाढवण्यात आले आहेत, असं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं आहे.

दरम्यान, राखीव साठ्यातून कांदा बाजारात आणल्यामुळं कांद्याची उपलब्धता आणि दरांत घट झाल्याचे चित्र आहे.

**बेल्जियम पंतप्रधान भारत दौरा**

बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर आजपासून भारताच्यातीन दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय संबंधांचे सर्व पैलू तसेच परस्पर हिताचे प्रादेशिक आणि जागतिक मुद्दे यांवर चर्चा करतील. मुंबई भेटीत ते हिरे, बंदरे आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातल्या विविध संबंधितांशी संवाद साधतील.

**गोयल-जर्मनीमंत्री**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल नवी दिल्लीत जर्मनीचे पर्यावरण, हवामान कृती, निसर्ग संवर्धन आणि अणुसुरक्षा मंत्री कार्स्टन श्नाइडर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी चक्रीय अर्थव्यवस्था, कचरा व्यवस्थापन, नवीकरणीय ऊर्जा, स्वच्छ तंत्रज्ञान आणि शाश्वत उपायांबाबतच्या सहकार्यावर चर्चा केली. भारत आणि जर्मनी मोठ्या प्रमाणावर लागू करता येतील असे पर्यावरणविषयक उपाय विकसित करू शकतात,असं गोयल यांनी समाजमाध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे.

**युक्रेन हल्ला**

युक्रेनवरील रशियाने नुकत्याच केलेल्या हल्ल्यात 12 जण ठार झाले असून, त्यात एका भारतीय नागरिकाचा समावेश आहे. अशी माहिती युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी काल दिली. या हल्ल्यात ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून पूर्व युरोपातील देशांतील शहरांना लक्ष्य करण्यात आलं.

**इराण**

अमेरिकेनं इराणमधील 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'च्या ठिकाणांवर नव्यानं हल्ले सुरू केले आहेत. यामध्ये हवाई संरक्षण यंत्रणा, सुरुंग पेरण्याची क्षमता आणि दळणवळण केंद्रे इत्यादींचा समावेश होता. अमेरिकेनं केलेल्या न्याय्य हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल इराणनं कारवाई केल्यास अमेरिका अधिक कठोर कारवाई करेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**नेपाळ पूर**

नेपाळमध्ये 26 ऑगस्टला आलेल्या पुरामध्ये आतापर्यंत 1,050 नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. परदेशी नागरिक, सुरक्षा कर्मचाऱ्यांसह जवळपास चार हजार लोक अजूनही बेपत्ता असल्याचं नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे.

**बिहार पूरस्थिती**

नेपाळमधल्या पुरामुळं बिहारच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये पुराचा धोका निर्माण झाला असतानाच, भागलपूरमध्ये गंगा नदीच्या काठावर होणाऱ्या तीव्र धूपेमुळे चिंता वाढली आहे. गंगा नदीच्या तीव्र धूपेमुळे नौगछिया ब्लॉकमधील एक जुनं दुर्गा मंदिर, हनुमान मंदिर आणि सुमारे 500 मीटर लांबीचा तटबंधवाहून गेला आहे. बाधित भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

**क्रिकेट संघ**

अफगाणिस्तानसमवेत आगामी टी-20 सामन्याच्या मालिकेसाठी 15 सदस्यांच्या भारतीय पुरुष संघाची घोषणा केली आहे. श्रेयस अय्यर संघ नायक असेल तर तिलक वर्मा उपसंघ नायक आहे. वैभव सूर्यवंशीलाही संघात स्थान देण्यात आलं आहे. 13 सप्टेंबरपासून ही मालिका सुरू होणार असून दिल्लीतील अरुण जेटली क्रिकेट मैदानावर हे सामने खेळवले जाणार आहेत.

**हवामान**

छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश, उत्तराखंड मधील काही ठिकाणी मुसळधार आणि अति मुसळधार पावसाचा हवामान विभागानं दिला आहे. त्याशिवाय देशातील उत्तर आणि नैऋत्य भागात साधारण अशीच हवामान स्थिती राहण्याची शक्यता आहे. तसंच आंध्र प्रदेश, तेलंगणा, रायलसीमा, कर्नाटक आणि तामिळनाडू बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.